# प्रकरण ७ वे

# संशोधन अहवालाचा सारांश निष्कर्ष व शिफारशी


७.१ प्रस्तावना.

७.२ प्रकरणाचे सुसुत्रीकरण.

७.३ सारांश.

७.४ निष्कर्ष.

७.५ शिफारशी .

७.६ पुढील संशोधनासाठी विषय .

संदर्भ ग्रंथ सूची.

परिशिष्टे.

अ :- प्रश्नावली.

ब :- अंतिम प्रश्नावली.

क :- मुलाखत आराखडे.

ड :- मुलाखतीसाठी निवडलेले प्रतिसादक.

इ :- निरीक्षण सूची.

ई :- निरीक्षणासाठी निवड केलेल्या शाळांची यादी.

१) दक्षिण सोलापूर तालुक्यातील शिक्षिकांची यादी.

२) दक्षिण सोलापूर तालुक्यातील मदतनीसांचे यादी.

# प्रकरण ७ वे

# संशोधन अहवालाचा सारांश, निष्कर्ष व शिफारशी

## ७.१ प्रस्तावना

संशोधकाने "दक्षिण सोलापूर तालुक्यातील एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत अंगणवाडया समस्याचा चिकित्सक अभ्यास" या विषयाची संशोधनासाठी निवड केली. त्यासाठी पूर्वप्राथमिक, अंगणवाडया शिक्षण, बालवाडी शिक्षण, प्राथमिक शिक्षण यासंबधी इतर प्रमाणित प्रश्नावली तसेच शिक्षकांचे संबधीत साहित्य इ. साधनाद्वारे माहिती मिळविली.

मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचिन प्रकरण क्रमांक ६ मध्ये करण्यात आलेले आहे.

## ७.२ प्रकरणाचे सुसुत्रीकरण

> **प्रकरण १ ले प्रास्ताविक :-**

अंगणवाडी शिक्षण हे शिक्षण क्षेत्रातील अतिशय उपेक्षित असे क्षेत्र आहे. या स्तरावरील शिक्षण विकासाच्या आड अनेक समस्या येतात. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अंगणवाडी शिक्षणाला अधिक चालना मिळणे आवश्यक होते. कारण प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी ज्या अनेक योजना कार्यवाहीत आणल्या जात आहेत त्यापैकीच एक योजना म्हणजे अंगणवाडी होय. प्रत्येक व्यक्तिच्या आयुष्यातील पहिली पाच - सहा वर्षे अतिशय महत्वाची असतात. या वयातील मुलांवर जे - जे संस्कार केले जातात. त्या सर्वांचा परिणाम त्यांच्या आयुष्यावर फार दुरगामी होत असतो. या वयाला संस्कारक्षम काल असे मानले जाते. म्हणून या संस्कारासाठी अंगणवाडी शिक्षणाची अत्यंत गरज आहे. संशोधकाने प्रस्तुत संशोधनाचे काम हाती घेतले आहे. पहिल्या प्रकरणामध्ये प्रस्तावना,

संशोधन अभ्यासाची गरज, संशोधन अभ्यासाचे महत्व, संशोधन समस्येचे शिर्षक तसेच काही प्रमुख संज्ञाची व्याख्या, संशोधनाचे प्रमुख उद्दिष्टे, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, दक्षिण सोलापूर तालुक्यातील माहिती याबाबतीत चिकित्सक आभ्यास केला आहेत.

> <u>प्रकरण २ रे संबधित साहित्याचा अभ्यास</u> :-

या प्रकरणात संबधीत साहित्याचा अभ्यास आणि कोणत्या संबधीत संशोधनाचा अभ्यास केला आहे याचे सविस्तर विवेचन केलेले आहे.

> <u>प्रकरण ३ रे अंगणवाडी शिक्षणाची पार्श्वभूमी</u> :-

या प्रकरणात अंगणवाडी शिक्षणाची पार्श्वभूमी वर्णन केलेली आहे. या प्रकरणात जगातील अंगणवाडी शिक्षणाची पार्श्वभूमी, भारतातील अंगणवाडी शिक्षणाची पाश्वभूमी, भारतातील अंगणवाडी शिक्षणातील काही प्रयोग, भारतातील अंगणवाडी शिक्षणासंबधी शासकीय आयोगाच्या शिफारशी, महाराष्ट्रातील अंगणवाडी शिक्षणाचा इतिहास, सोलापूर जिल्ह्यातील अंगणवाडी शिक्षणाचा इतिहास, दक्षिण सोलापूर तालुक्यातील अंगणवाडी शिक्षणाचा इतिहास याबाबतचे विवेचन केलेले आहे.

> <u>प्रकरण ४ थे अंगणवाडी शिक्षणाची तात्वीक व मानसशास्त्रीय बैठक</u> :-

या प्रकरणात अंगणवाडी शिक्षणाची तात्वीक व मानसशास्त्रीय बैठकाविषयी संबधीत माहिती दिलेली आहे. या प्रकरणात अंगणवाडी शिक्षणाचे महत्व, अंगणवाडी शिक्षणाच्या पध्दती, अंगणवाडी शिक्षणाचे उद्दिष्टे याबाबत माहिती दिली आहे.

> **प्रकरण ५ वे संशोधन पध्दती व साधने :-**

या प्रकरणामध्ये संशोधन पध्दतीची निवड, नमुना निवड, संशोधनाची साधने, प्रश्नावली या साधनाचा वापर कसा केला व साधनाद्वारे मिळालेल्या माहितीसाठी संख्याशास्त्राचा वापर कसा करण्यात आला याबाबतची माहिती दिलेली आहे.

> **प्रकरण ६ वे माहिती, संकलन, विषदीकरण आणि विश्लेषण :-**

या प्रकरणात गोळा केलेल्या माहितीच्या आधारे संख्याशास्त्राच्या साह्याने माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले आहे.

> **प्रकरण ७ वे संशोधन अहवालाचा सारांश, निष्कर्ष व शिफारशी :-**

या प्रकरणात संशोधनाचा सारांश, निष्कर्ष व शिफारशी या संबधी माहिती दिली आहे. तसेच पुढील संशोधनासाठी विषय दिले आहेत.

## ७.३.१ *सारांश*

अंगणवाडी शिक्षण हे शिक्षण क्षेत्रातील अतिशय उपेक्षित असे क्षेत्र आहे. या स्तरावरील शिक्षण विकासाच्या आड अनेक समस्या येतात. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अंगणवाडी शिक्षणाला अधिक चालना मिळणे आवश्यक होते. कारण प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी ज्या अनेक योजना कार्यवाहीत आणल्या जात आहेत त्यापैकीच एक योजना म्हणजे अंगणवाडी होय. अंगणवाडी शिक्षणाचा प्रसार व प्रचार करणे आवश्यक आहे.

अंगणवाडी शिक्षण म्हणजे प्राथमिक शिक्षणाची सुरुवात होण्यापूर्वी बालकांना दिले जाणार शिक्षण असे सर्वसाधारणपणे म्हणता येइल. "प्राथमिक शिक्षणाच्या प्रारंभापूर्वी सुमारे तीन ते पाच या वयात जे शिक्षण दिले जाते ते

अंगणवाडी शिक्षण होय. अंगणवाडी शिक्षण हा सर्व शिक्षणाचा पाया आहे. व्यक्तिच्या सर्वांगिण विकासाची मुहूर्तमेढ बालकाच्या संस्कारक्षम वयातच रोवावयास पाहिजे.

प्रत्येक व्यक्तिच्या आयुष्यातील पहिली पाच - सहा वर्षे अतिशय महत्वाची असतात. या वयातील मुलांवर जे - जे संस्कार केले जातात त्या सर्वांचा परीणाम त्यांच्या आयुष्यावर फार दूरगामी होत असतो. म्हणून या वयाला 'संस्कारक्षम काल' असे म्हणतात. म्हणून या संस्कारासाठी अंगणवाडी शिक्षणाची अत्यंत गरज आहे. समाजालाही या शिक्षणाचे दिवसेंदिवस महत्व जाणवू लागले आहे. त्यामुळे आज अंगणवाडी शाळांना ग्रामीण विभागातही लोकप्रियता लाभत आहे.

सार्जंट अहवालात या शिक्षणाचा प्रथमच उल्लेख कराण्यात आला. मुंबई राज्य सरकारने श्रीमती सुलभाबाई पांणदीकर यांच्या अध्यक्षतेखाली या शिक्षणाचे कार्य व त्यांना देण्यात येणारे अनुदान यांची पाहणी करण्यासाठी एक समिती नेमली होती. भारतीय शिक्षण आयोगाच्या अहवालातही या शिक्षणाचे उद्दिष्टे व महत्व यांचे निदेर्शन केले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये बालसंगोपन व बालशिक्षण यांना अग्रक्रम देण्यात आला आहे. तसेच अंगणवाडी शिक्षणाच्या सार्वत्रिकरणास पुरक म्हणून बालसंगोपनगृहे स्थापन्यात येणार आहेत.

## ७.३.२ *संशोधनाचे महत्व*

शिक्षणाचे ध्येय साध्य करण्यात अंगणवाडी शिक्षणाकडे लक्ष देणे अत्यंत जरुरीचे आहे. भारतात पूर्वी एकत्र कुटुंब पध्दतीत अंगणवाडी शिक्षण घरीच मिळत असे. आज एकत्र कुटुंब प्रध्दती मागे पडू लागली आहे. पाश्चात्य देशामधील वारे भारतातही वाहू लागले आहे. त्यामुळे आजच्या विभक्त कुटुंब पध्दतीतील कृत्रिम वातावरणात मुलांची शारिरीक, भावनिक आणि बौध्दीकदृष्या

उपासमार होत आहे. त्यामुळे आज शहरामध्ये व खेडयामध्ये अंगणवाडी शिक्षणाची विशेष गरज भासत आहे.

संशोधकाच्या या संशोधनामुळे महाराष्ट्र शासन, समाजकल्याण खाते, व जिल्हापरिषद यांच्यामार्फत चालविल्या जाणा-या अंगणवडी शाळेमधील मुख्याध्यापिका, शिक्षिका, शासकीय शैक्षणिक प्रसासनाधिकारी व पालक - शिक्षक संघाचे अध्यक्ष यांना मार्गदर्शन मिळाले. तसेच सद्यःस्थितीतील या शिक्षणातील समस्या दूर करण्यात प्रेरणा मिळावी या उद्देशाने संशोधकाने या विषयाची निवड केलेली आहे.

## ७.३.३ *संशोधन अभ्यासाची गरज*

संशोधकाच्या मोठा भावाचा मुलगा अंगणवाडी शाळेत २००१ ते २००२ या काळात शिक्षण घेत होता. त्यानिमित्ताने त्याला शाळेत पोहचविण्यसाठी व आणण्यासाठी शाळेत जावे लागत होते. सोलापूर जिल्ह्यातील तालुक्याच्या ठिकाणी व ग्रामीण भागात असणा-या अंगणवाडी शाळांच्या व या शिक्षणाच्या कोणकोणत्या समस्या आहेत तसेच सोलापूर जिल्ह्यातील अंगणवाडी शिक्षणावर व शाळेच्या समस्यावर आजपर्यंत कोणतेही संशोधन झालेले नाही. म्हणून संशोधकाने मुद्दाम या समस्येची निवड केली आहे.

अंगणवाडी या समस्येचा अभ्यास करताना अंगणवाडी शिक्षणात शालेय परिसर हा अत्यंत महत्वाचा घटक असून ब-याच शाळेतील शालेय परिसर योग्य असा दिसून आला नाही. बालशिक्षणात योग्य असा परिसर करुन बालकास हवे तसे शिक्षण दिले जात नाही असे दिसून आले. संशोधकास आजच्या या शाळेमध्ये बालकाच्या विकासापेक्षा घडवणीवर व स्वातत्र्यापेक्षा बंधनावर अधिक भर दिला जात आहे असे दिसून आले. अंगणवाडी शिक्षणात इंद्रिय शिक्षण व स्नायू शिक्षण अतिशय महत्वाचे असुनसुध्दा शाळेमध्ये क्रिडांगणाअभावी व

साहित्याअभावी या दोन्हीप्रकारचे शिक्षण व्यवस्थित मिळत नाही असे नजरेत आले.

अंगणवाडी शाळेच्या अनेक समस्या दिसून आल्या आहेत. दक्षिण सोलापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील शाळेंच्या जर अनेक समस्या आहेत तर जिल्ह्यातील इतर तालुक्याच्या ठिकाणी व ग्रामीण भागातील या स्तरावरील शाळेंच्या व शिक्षणाच्या कोणकोणत्या समस्या आहेत हे जाणून घेण्यासाठी या विषयाची निवड केलेली आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यात कोणकोणत्या प्रकारच्या व्यवस्थापनामार्फत कोणकोणत्या विभागात या शाळा चालविल्या जात आहेत व त्यांच्या कोणत्या समस्या आहेत हे जाणून घेण्यासाठी व तालुक्यातील या शिक्षणावर व शाळेंच्या समस्यावर आजपर्यंत कोणतेही संशोधन झालेले नाही म्हणून संशोधकाने मुद्दाम या समस्येची निवड केलेली आहे.

## ७.३.४ *संशोधन समस्येचे शिर्षक*

"दक्षिण सोलापूर तालुक्यातील एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत अंगणवाडयांच्या समस्येचा चिकित्सक अभ्यास"

## ७.३.५ *संशोधनाचे उद्दिष्टे*

या अभ्यासाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे निश्चत केलेली आहेत.

१) दक्षिण सोलापूर तालूक्यातील अंगणवाडीचे व्यवस्थापन व प्रशासन यांचा अभ्यास करणे.

२) अंगणवाडी मधील उपलब्ध शैक्षणिक साहित्याचा व त्या साहित्याच्या वापरासंबधी अभ्यास.

३) अंगणवाडीमधील तीन ते सहा वयोगटातील बालकांवरील संस्कार, आहार, पोषण व आरोग्यविषयक सुविधांचा अभ्यास.

४) या वयोगटातील बालकांचा मानसिक शारिरीक व सामाजिक विकास यासंदर्भातील अभ्यास करणे.

५) बालरोग व कुपोषण याचा शिक्षणावरील होणा-या परीणामाचा अभ्यास करणे.

६) एकात्मिक बालविकास प्रकल्पामधील कार्य करणा-या सेवकाच्या समस्येचा अभ्यास करणे.

७) एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत अंगणवाडयाच्या समस्या संदर्भात उपाययोजना सुचविणे.

## ७.३.६ *संशोधनाची व्याप्ती व मर्यादा*

संशोधकाने निवडलेली समस्या दक्षिण सोलापूर तालुक्यातील मराठी माध्यामाच्या अंगणवाडी शाळांपुरतीच मर्यादीत आहे. सदरहू संशोधनात पालकांच्या सामाजिक व आर्थिक दर्जाचा विचार केलेला नाही. यासंशोधनात दक्षिण सोलापूर तालुक्यातील शासनामार्फत चालविल्या जाणा-या अंगणवाडी शाळांचा अभ्यास केलेला आहे.

## ७.३.७ *संबधीत संशोधनाचे समीक्षण*

या संबधीच्या दहा पूर्व संशोधनांचा अभ्यास करुन समीक्षण केलेले आहे.

> संशोधन पध्दती व साधने

१) पध्दती

सदरहू संशोधनासाठी वर्णणात्मक सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

२) **नमुना निवड**

नमुना निवड या पध्दतीत प्रश्नावली या पध्दतीचा तसेच मुलाखत व निरिक्षण या नमुना पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

अ) **प्रश्नावली**

या अभ्यासात सर्व १८१ शाळांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे दक्षिण सोलापूर तालुक्यातील सर्व शाळेमधील सर्व शिक्षिकांना प्रश्नावली देण्यात आली आहे.

ब) **मुलाखत व निरिक्षण**

मुलाखत व निरिक्षण यासाठी शाळांची व प्रतिसाधकाची निवड करण्यासाठी स्तरीय यादृच्छिक नमुना पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

३) **घटक**

या संशोधन अभ्यासामध्ये अंगणवाडी शिक्षणातील पुढील घटकाचा समावेश करुन अभ्यास करण्यात आला आहे.

१) शालेय व्यवस्थापन व प्रशासन

२) शालेय परिसर

३) उलब्ध साहित्य व त्या साहित्याचा वापर

४) शालेय समस्या

४) **संशोधन साधने**

१) प्रश्नावली

२) मुलाखत

३) निरिक्षण

५) **वर्गीकरण**

विविध व्यवस्थापनाच्या शाळेंच्या संख्येनुसार वर्गीकरण करुन मुलाखती घेण्यात आल्या आहेत.

६) संख्याशास्त्राचा उपयोग

संशोधन प्रक्रियेत जमा केलेल्या माहितीचा उपयोग करण्यासाठी शेकडावारी या संख्याशास्त्रीय मापनाचा वापर केला आहे.

या संशोधनासाठी आवश्यक माहिती पुढील तीन साधनांच्या साह्याने गोळा करण्यात आली आहे.

१) प्रश्नावली

२) मुलाखत

३) निरिक्षण

या तीन साधनाच्या उपयोगाची माहिती खालीलप्रमाणे थोडक्यात दिलेली आहे.

- प्रश्नावली

दक्षिण सोलापूर तालुक्यातील सर्व अंगणवाडी शाळेमध्ये सर्व शिक्षिकांना प्रश्नावली देण्यात आली होती. त्यापैकी निरनिराळया व्यवस्थापनाप्रमाणे प्रश्नावली प्राप्त झालेल्या शाळेंची टक्केवारी काढण्यात आली. प्रश्नावलीतून खालील विभागाची माहिती गोळा करण्यात आली.

१) शिक्षिकेंची व्यावसायीक पात्रता

२) शिक्षिकांचा व्यावसायीक अनुभव

३) मुलांचे आरोग्य

४) शालेय क्रिडांगण

५) मुक्त व्यवसायाची साधने

६) मधल्या सुट्टीतील जेवण व्यवस्था

७) शिक्षिकांच्या समस्या

> ## मुलाखत

दक्षिण सोलापूर तालुक्यातील १८१ अंगणवाडी शाळा चालविल्या जातात या सर्व शाळा शासनाच्या व्यवस्थापनाखाली चालविण्यात येतात. प्रत्येक शाळेच्या व्यवस्थापनाखाली चालविण्यात येणा-या शाळांच्या संख्येच्या प्रमाणात १० टक्के प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून संशोधकाने स्तरीय यादृच्छिक नमुना पध्दतीने मुलाखतीसाठी शाळेंची निवड केली. वरीलप्रमाणे १८ मुख्याध्यापिकांची मुलाखतीसाठी निवड करण्यात आली.

> ## निरिक्षण

शाळेंची वस्तुस्थिती कशी आहे हे संशोधनात पाहणे आवश्यक असल्यामुळे निरिक्षण तंत्राचा वापर केला आहे. मुलाखतीसाठी ज्या १८ शाळांची निवड केली आहे त्याच शाळेंची निरिक्षणासाठी निवड केली आहे. निरिक्षणात खालील बाबींचे प्रामुख्याने निरीक्षण केले आहे.

१) शालेय परिसर

२) शालेय इमारत

३) शालेय क्रिडांगण व क्रिडांगणावरील खेळ साधने

४) उपलब्ध शैक्षणिक साहित्य व त्याचा वापर

५) पाणीपुरवठा

६) मधल्या सुट्टीतील जेवणाची व्यवस्था

७) स्वच्छतागृहे

संशोधनाच्या प्रश्नावली, मुलाखत आणि निरिक्षण यासाधना द्वारे माहिती संकलीत करुन त्या माहितीचे विश्लेषण केलेले आहे. संकलीत सांख्यिकी माहिती व तिचे विश्लेषण यावर आधारित निष्कर्ष व शिफारशी पुढील प्रमाणे आहेत.

## ७.४ निष्कर्ष

प्रश्नावली, मुलाखत आणि निरिक्षण या साधनाद्वारे प्राप्त माहितीचे विश्लेषण करुन संशोधनाच्या उद्दिष्टानुसार पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत.

अ) <u>शालेय व्यवस्थापन व प्रशासन</u> :-

१) दक्षिण सोलापूर तालुक्यात शासनामार्फत १८१ अंगणवाडया शाळा चालविल्या जात आहेत.

२) दक्षिण सोलापूर तालुका हा ग्रामीण विभाग असल्याने काही गावात जास्त शाळा आहेत व काही गावात कमी शाळा आहेत. सर्वात जास्त शाळा कुंभारी, वळसंग, मंद्रुप या ठिकाणी आहेत.

३) खाजगी संस्थामार्फत दक्षिण सोलापूर तालुक्यात एकही अंगणवाडी शाळा नाही. सर्व शाळा शासनामार्फत चालविल्या जात आहे.

४) ज्या अंगणवाडी शाळा चालविल्या जातात त्या शाळा चालविण्याचा उद्देश पुढील प्रमाणे आहे. उदा.

   १) या वयागटातील मुलांचा सर्वांगिण विकास करणे.

   २) या शिक्षणापासुन वंचित असलेल्या मुलांना संधी प्राप्त करुन देणे.

   ३) प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता सुधारणे.

   ४) प्राथमिक शिक्षण अध्यविरच सोडून देण्याची वृत्ती कमी होवून पैशा अपव्यय टाळणे.

   ५) मुलांच्या शारिरीक व मानसिक उन्नतीच्या दृष्टीने आधारभूत जोपासना करणे.

   ६) सर्व अंगणवाडी शाळा शासनामार्फत चालविल्या जात असल्याने सर्व शाळेंची शालेय तपासणी व्यवस्थित होत असतेच असे नाही.

७) अंगणवाडी शाळा शासनामार्फत चालविल्या जात असल्याने सर्व शाळेंच्या इमारती शासनाच्या मालकीच्या आहेत.

८) अंगणवाडी शाळा शासनामार्फत चालविल्या जात असल्याने मुलांकडून प्रवेश फी अथवा टर्म फी अशा प्रकारच्या फी घेतल्या जात नाहीत अंगणवाडीशाळा ही शासनामार्फत मुलांना विनामुल्य शिकविल्या जात आहेत.

९) मुलांना बसण्यासाठी लाकडी बाकाची उपयोग करणा-या शाळांचे प्रमाण ०.० टक्के आहे. अंगणवाडी शाळेत एका शाळेत ही लाकडी बाकाची व्यवस्था नाही. सतरंजी वापर करणा-या शाळांचे प्रमाण ३१.४९ टक्के आहे. जमीनीवर बसविण्यात येणा-या शाळांचे प्रमाण ६८.५१ टक्के आहे. यावरुन असे दिसून येते की काही थोडयाच शाळांमध्ये सतरंजीचा वापर बसण्यासाठी केला जातो. बहुसंख्य शाळांमध्ये मुलांना बसण्यासाठी कशाचाही उपयोग केला जात नाही.

१०) पालकांकडून सहकार्य मिळविणा-या शाळांचे प्रमाण ३७.५६ टक्के आहे. सहकार्य न मिळणा-या शाळांचे प्रमाण ६२.४४ टक्के आहे. यावरुन पालाकांकडून अधिक प्रमाणत सहकार्य मिळकत नाही.

११) वैघकीय तपासणीचे महत्व असतानासुध्दा कमी शाळेतच डॉक्टर येतात त्याचे प्रमाण २६.५ टक्के आहे. तपासणी न करुन घेणा-या शाळांचे प्रमाण ६७.९ टक्के आहे. तपासणी न करुन घेणा-या शाळांचे प्रमाण फारच जास्त आहे.

१२) वैघकीय तपासणी करुन पालकांकडे तपासणी अहवाल पाठवण-या शाळेचे प्रमाण ११.७ टक्के इतके आहे. तपासणी अहवाल न

पाठविण-या शाळेचे प्रमाण २०.९ टक्के इतके आहे. वैद्यकीय तपासणी अहवाल पालकांना पाठविण्याचे प्रमाण फारच कमी आहे.

१३) शाळेमध्ये एकूण मुलांची संख्या १०० टक्या पर्यंत आहेत अशी एकही शाळा उपलब्ध नाही परंतु ९० ते १०० टक्केपर्यंत उपस्थित असलेल्या शाळेचे प्रमाण ५.६ टक्के इतके आहे. ८० ते ९० टक्के पर्यंत मुलांची उपस्थिती असलेल्या शाळेचे प्रमाण १४.४ टक्के इतके आहे. ७० ते ८० टक्केपर्यंत मुलांची उपस्थिती असलेल्या शाळेचे प्रमाण २०.४ टक्के इतके आहे. ६० ते ७० टक्केपर्यंत उपस्थिती असलेल्या शाळेचे प्रमाण १२.१ टक्का इतका आहे. ५० ते ६० टक्के उपस्थिती असलेल्या शाळेचे प्रमाण ११.६ टक्के इतके आहे. ५० पेक्षा कमी उपस्थिती असलेल्या शाळेचे प्रमाण ३५.९ टक्के इतके आहे. अशा त-हेने ५० पेक्षा कमी उपस्थिती असणा-या शाळेंचे प्रमाण जास्त आहे.

१४) लहान शिशु व मोठा शिशु असे स्वतंत्र्य गट करुन अध्यापन करणा-या शाळेचे प्रमाण अनुक्रमे १३.८ टक्के इतके आहे. दोन्ही गट एकत्र करुन अध्यापन करणा-या शाळेचे प्रमाण ७२.४ टक्के इतके आहे. हे प्रमाण त्या मानाने जास्त आहे. दोन्ही गट वेगवेगळया गटात विभाजन करुन अध्यापन करण्या-या शाळेचे प्रमाण कमी आहे.

१५) सर्वांना वर्तूळाकार बसवून शाळेने तयार केलेले पदार्थ खाणा-या शाळेचे प्रमाण जास्त आहे. सर्वांचे डबे एकत्रित करुन सर्वांना वाटप करणा-या शाळेचे प्रमाण फारच कमी आहे.

१६) शासनामार्फत चालविण्यात येणा-या शाळेच्या इमारती शिक्षकाची व्यावसायीक पात्रता, पगार, इ. बाबींसंबधी व्यवस्थापन व प्रशासन अपेक्षित असे नाही.

ब) <u>शालेय परिसर</u> :-

१) शासनामार्फत चालविण्यात येणा-या सर्व शाळांच्या इमारती पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व स्वच्छतागृहे यांची नियोजपूर्वक व्यवस्था केली आहे.

२) दक्षिण सोलापूर तालुका हा ग्रामीण विभागात मोडत असल्याने सुमारे ५० टक्के शाळांचा शालेय परिसर अपेक्षित असा आहे.

३) शालेय क्रिडांगणाची उपलब्धता असणा-या शाळेचे प्रमाण ६९.१ टक्के इतके आहे. क्रिडांगण उपलब्ध नाही अशा शाळेंचे प्रमाण ३०.९ टक्के इतके आहे.

४) मुलांना पाणी पिण्यासाठी टाकी, हौद यांचा वापर करणा-या शाळेंचे अनुक्रमे प्रमाण १९.३ व २५.५ टक्के इतके आहे. त्यापेक्षा टिप व माठ द्वारा पिणा-या पाण्याची व्यवस्था जास्त आहे. टिप द्वारा पाणी पिण्याचे प्रमाण ३१.४ टक्के इतके आहे तर माठ व इतराचे प्रमाण २३.८ टक्के इतेक आहे. बहुसंख्य शाळेमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टिप व हौद याचाच वापर केला आहे.

क) <u>उपलब्ध साहित्य व साहित्याचा वापर</u> :-

१) क्रिडांगणावरील सर्व अपेक्षित साधने खेळण्यासाठी शाळांना क्रिडांगणाची आवश्यकता असते. त्याचप्रमाणे खेळण्यासाठी साधनाचीही आवश्यकता असते. मुक्त व्यवसायाची साधने असलेल्या शाळेचे प्रमाण ६५.२ टक्के इतके आहे. साधने माहित नाही म्हणणा-या शाळेचे प्रमाण ३४८ टक्के इतके आहे. सर्व प्रकारची साधने उपलब्ध आहेत असे म्हणणा-या शाळेचे प्रमाण एकही नाही.

२) निरिक्षणासाठी निवड केलेल्या शाळेमध्ये क्रिडांगणावरील अपेक्षित सर्व साधने उपलब्ध होती व त्या साधनांचा वापर मुलांकडून होत आहे असे दिसून आले. काही शाळेमध्ये घसरगुंडी, सी - सॉ, झोके ही साधने उपलब्ध होती व त्या साधनांचा उपयोग मुलांकडून होत असे दिसून आले. इतर शाळेमध्ये कोणत्याही प्रकारची क्रिडांगणावरील खेळ साधने उपलब्ध नव्हती.

३) अपेक्षित वाद्यसाहित्य असलेल्या शाळांचे प्रमा २४.३ टक्के आहे. वाद्यसाहित्य नसलेल्या शाळांचे प्रमाण २२.६ टक्के आहे यावरुन अपेक्षित वाद्यसाहित्य असेल्या शाळांचे प्रमाण फारच कमी आहे.

४) सुमारे ५०.०० टक्के शाळांमध्ये अर्धवेळ संगीत शिक्षिकांची नेमणूक केलेली आहे. ग्रामीण विभागातील शाळंमध्ये संगीत जाणणा-या शिक्षिका नाहीत. त्यामुळे वाद्यशिक्षिका मिळत नाहीत.

ड) अन्य समस्या

१) अपेक्षित शैक्षणिक पात्रताधारक शिक्षिका उपलब्ध नाहीत

१) मॉन्टेसरी ट्रेन्ड व अंगणवाडी डी.एड. अशा शैक्षणिक पात्रतेच्या शिक्षिकांचे अनुक्रमे प्रमाण १७.२ टक्के व १२.२ टक्के आहे. हे प्रमाण अधिक असावयास पाहिजे होते. परंतु हे प्रमाण फारच कमी आहे.

२) दहावी पेक्षा कमी शैक्षणिक पात्रता असणा-या शिक्षिकांचे प्रमाण २४.८ टक्के आहे. या वरुन जास्त शिक्षिका या दहावी पेक्षा कमी शैक्षणिक पात्रतेच्या व बालशिक्षणाचे कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण घेतलेल्या नाहीत.

३) अनुभवी व तज्ञ शिक्षिकांचा अभाव

तीन वर्षापेक्षा कमी अनुभव अध्यापन असलेल्या शिक्षिकांचे प्रमाण ६८.५ टक्के इतका आहे. यावरुन या क्षेत्रात तीन वर्षापेक्षा अधिक अनुभव असलेल्या शिक्षिकांचे प्रमाण फारच कमी आहे.

## ४) कायम शिक्षिकांचे प्रमाण अधिक

नोकरीत कायम शिक्षिकांचे प्रमाण १०० टक्के आहे अंगणवाडी शळा ही शासनामार्फत चालविल्या जात असल्याने शिक्षिकाची नेमणूक कायम स्वरुपी करतात.

## ५) वर्गात मुलांची संख्या जास्त

वर्गात ४० पर्यंत मुलांची संख्या असणा-या शाळांचे प्रमाण ६६.७ टक्के आहे. वर्ग तुकडीत ४० ते ६० पर्यंत असणा-या शाळांचे प्रमाण २२.३ टक्के आहे. ६० पेक्षा जास्त असणा-या शाळांचे प्रमाण ११ टक्के आहे. यावरुन वर्गतुकडीत चाळीसपक्षे कमी मुलांची संख्या असणा-या शाळांचे प्रमाण कमी आहे.

## ६) मोफत शिक्षण व मधल्या सुट्टीतील जेवण

अंगणवाडी शिक्षण हे मोफत शिक्षण आहे व काही शाळेत जेवणाची व्यवस्था आहे. पण काही शाळेत जेवणाची व्यवस्था नाही. जेवणाची व्यस्था असलेल्या शाळेचे प्रमाण ४५.५ टक्के आहे.

## ७) अत्यल्प वेतन

अंगणवडी शिक्षिकांना शासनामर्फत अत्यल्प वेतन दिले जाते. अंगणवाडी शिक्षिकांना दरमहा १४००/- रु. वेतन दिले जाते. तसेच अंगणवाडी मदतनिस म्हणून कार्य करणा-या सेविकेला ७०० रुपये वेतन मिळत आहे. त्यामुळे या शाळांमधील नोकरी सोडून जाणा-या शिक्षिकांचे प्रमाण जास्त आहे.

## ८) खेळ साहित्याचा अभाव

अंगणवाडी शाळांमध्ये क्रिडांगणाचे प्रमाण जास्त आहे व परंतु या शाळांमध्ये खेळ साधने अत्यंत अत्यल्प आहेत. साधने काही - काही शाळेत आहेत परंतु त्या साधनाचा अपेक्षित वापर करत नाहीत.

९) <u>पालकांचे शिक्षण</u>

अशिक्षित पालक मुलांच्या आरोग्यासाठी काळजी घेतात अशा शाळांचे प्रमाण ५३.६ टक्के आहे. सुशिक्षित पालक मुलांच्या आरोग्याची काळजी घेतात अशा शाळांचे प्रमाण ६०.९ टक्के आहे. अशिक्षित पालकांपेक्षा सुशिक्षित पालक मुलांच्या वैयक्ति आरोग्याची काळजी अधित घेतात.

## ७.५ *शिफारशी*

प्रश्नावली, मुलाखत आणि निरीक्षण या साधनाद्वारे प्राप्त केलेल्या माहितीचे विश्लेषण करुन संशोधनाच्या उद्दिष्टांनुसार पुढील प्रमाणे शिफारसी करण्यात आलेल्या.

अ) <u>शालेय व्यवस्थापन व प्रशासन</u>

१) दक्षिण सोलापूर तालुक्यांत अजून काहि गावात अंगणवाडी शाळा नाहित त्या ठिकाणी शासनानी अंगणवाडी शाळा काढावीत संस्थेत वाढ करावीत.

२) शासनामार्फत ग्रामीण विभागात प्रत्येक खेडया शाळांसाठी नियोजपूर्वक शालेय इमारत बांधण्याचा विचार कराव.

३) अंगणवाडी शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शासनाने योग्य ती सवलत व मधल्या सुट्टीत जेवणाची व्यवस्था करावी.

४) ग्रामीण विभागीतील अंगणवाडयामध्ये मुलाना बसण्याकरीता सतरंजीचा किंवा गोणपाटाचा वापर करावी.

५) अंगणवाडी शाळांमध्ये पालकांकडून सहाकार्य मिळविण्यासाठी शिक्षिकांना पलकांशी सतत संपर्क ठेवण्याचा प्रयत्न करावा.

६) प्रत्येक शाळेने शाळेत डॉक्टरांना आणून वर्षातून एका वेळी वैद्यकीय तपासणी करुन घ्यावी व वैद्यकीय तपासणी अहवाल पालकांकडे पाठवावा.

७) ज्या शाळा मुलांची वैद्यकीय तपासणी करुन घेत नाहीत अशा शाळानी दरवर्षी नियमित तपासणी करुन घ्यावी केंद्रामार्फत अंगणवाडया मधील मुलांची वैद्यकीय तपासणी होईल. अशी व्यवस्था करण्यात यावी.

८) ज्या शाळांमध्ये जेवणाचे डबे नसलेल्या मुलांची कोणतीही व्यवस्था केली जात नाही. अशा शाळांनी त्या मुलांसाठी सर्व मुलांचे डबे एकत्रित करुन त्यांनाही वाटप करण्याची व्यवस्था करावी.

९) खेडयातील शाळामधील मुलांना शासनामार्फत अल्पोपहार देण्याची व्यवस्था करावी.

१०) शासनानी शिक्षकांची नेमणूक करताना व्यवसायिक पात्रतेचा विचार करावा. तसेच शिक्षिकांच्या वेतनात सुधारणा करणे अपेक्षित आहे.

ब) शालेय परिसर

१) शासनानी ज्या शाळांची नियोजपूर्वक विकास केला नाही. अशा शाळांची शालेय इमारत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, क्रिडांगण व स्वच्छतागृहे इत्यादी बाबींचा नियोजपूर्वक विकास करावा.

२) शासनामार्फत चालविण्यात येणा-या सर्व शाळांचा शालेय परिसर नियोजनपूर्वक विकसित करण्यात यावा.

३) ज्या अंगणवाडी शाळांना क्रिडांगण नाही अशा शाळांनी आपल्या शेजारच्या प्राथमिक शाळा माध्यमिक शाळा यांच्या क्रिडांगणाचा वापर करण्याची व्यवस्था करावी.

क) उपलब्ध साहित्य व त्या साहित्याचा वापर

१) ज्या शाळांमधील क्रिडांगणावरील खेळ साहित्य व मुक्त व्यवसायाची साधने यांचे या शिक्षणातील महत्व लक्षात घेऊन ग्रामपंचायत अथवा शासनामार्फत अंगणवाडी शाळांना ही साधने उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करावा.

२) क्रिडांगणावरील खेळ साहित्याचे व मुक्त व्यवसायाची साधने यांचे या शिक्षणातील महत्व लक्षात घेऊन ग्रामपंचायत अथवा शासनामार्फत अंगणवाडी शाळांना ही साधने उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करावा.

३) ज्या शाळांमध्ये वाद्य साहित्य नाही अशा शाळांनी या शिक्षणाची अपेक्षित वाद्यसाहित्य ठेवण्याचा प्रयत्न करावा.

४) खेडयातील शिक्षिकांनी आपल्या गावातील भजनी मंडळाचे सहकार्य घेऊन वाद्य साहित्याची गरज भागविण्याचा प्रयत्न करावा.

३) अन्य समस्या

१) अंगणवाडी शाळेत मॉन्टेसरी ट्रेंन्ड व अंगणावाडी डी.एड्. शैक्षणिक पात्रतेच्या शिक्षिकांची नेमणूक करण्यात यावी. अप्रशिक्षित व अधिक पात्रतेच्या प्रशिक्षित शिक्षिकांची नेमणूक करण्यात येऊ नये. या शाळामधील शिक्षिकांमधील शिक्षिकांची नेमणूक पात्रता पाहून करण्यात यावी.

२) अंगणवाडी शाळामध्ये एका वर्ग तुकडीत ४० पेक्षा अधिक मुलांना प्रवेश देऊ नयेत.

३) खेडयातील शिक्षिकांचे नोरीतील प्रमाण टिकवून ठेवण्यासाठी शासनानी त्याच्या वेतनात वाढ करावी.

४) खेडयामधील शाळांमध्ये मधल्या सुट्टीत मुलांना शासनामार्फत अल्पोपहार देण्याची व्यवस्था सुरु करावी.

५) प्रत्येक अंगणवाडी शाळेने आपल्या शाळेत पालक - शिक्षक संघाची स्थापना करावी.

## ७.६ पुढील संशोधनासाठी विषय

या संशोधनाच्या विषयाची व्याप्ती व मर्यादा लक्षात घेवून या सारख्या आणखी विषयावर संशोधन होणे गरजेचे आहे. म्हणून संशोधकाने सदर संशोधनाच्या आधारे काही विषय संशोधनासाठी सुचविले आहेत.

१) "उर्दू माध्यमाच्या पूर्व प्राथमिक शिक्षणाच्या समस्यांचा अभ्यास करुन त्याबाबत उपाययोजना सुचविणे"

२) पूर्व प्राथमिक शिक्षणाचा प्राथमिक शिक्षणावर होणारा परिणामाचा

३) " सोलापुर शहरातील महानगरपालिका संचलित एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत अंगणवाडयाच्या समस्यांचा आभ्यास करणे"

४) "सोलापूर जिल्हा हा कर्नाटक व आंध्र प्रदेशाच्या सीमारेषेवर असल्याने तेथे बहुभाषिक लोक अधिक आहेत. मराठी माध्यमाशिवाय इंग्रजी, कन्नड, हिंन्दी, उर्दू, तेलगु, कन्नड या माध्यमांच्या शिक्षकांच्या अभियोग्यतेबाबत संशोधन अभ्यास करणे"

## :-: संदर्भ ग्रंथ सूची :-:


१) Aggarwal J.C. :- **"Educational Research on Introduction"**

New Delhi, Arya Book Depot, 2nd Edition - 1975.

२) Buch. M.B. :- **"Third Survey of Research in Education - 1978 - 83."**

३) Buch M.B. :- **"Second Survey of Research in Education"**

Published by Society for Educational Research and Development Baroda, first Edition - 1979.

४) Bunch M.B. :- **"A Survey of Research in Education"**

Published by M.S. University of Baroda, first Edition March - 1974.

५) Bhatnagar R.P. :- **"Agrwal Vidya Educational Administration"**

Published by Mearut (U.P.) International publishing House, Second Edtion 1986.

६) Best John W. :- **"Research in Education"**

New Delhi, prentice Hall of India private Limited Delhi, forth Edition - 1982.

७) Besh John W. :- **"James V. Kahn Research in Education"**

New Delhi - prentice Hall of India, Edition - 1985.

८) करंदीकर सुरेश :- "शैक्षणिक मानसशास्त्र"
कोल्हापूर : फडके प्रकाशन,
प्रथम आवृत्ती - १९९४.

९) कुंडले म.बा. :- "शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र"
पुणे : श्री विद्या प्रकाशन
प्रकाशन सहावे आवृत्ती - १९८६.

१०) केळकर स.आ. "बालमंदिराचे शिक्षण सिध्दांत व व्यवहार"
मुंबई : केळकर प्रकाशन शीव.
प्रथम आवृत्ती १९६१.

११) केळकर स.आ. :- "ताराबाई व बालशिक्षण"
मुंबई : केळकर प्रकाशन शीव.
आवृत्ती १९६२.

१२) केळकर स.आ. :- "बालखेळ"
मुंबई : केळकर प्रकाशन शीव.
प्रथम आवृत्ती १९६२

१३) केळकर स.आ. :- "बालक्रिडांगण" मुंबई
केळकर प्रकाशन लक्ष्मी बाल जोगळेकर शीव.
प्रथम आवृत्ती - १९६२.

१४) खानविलकर भा.र. :- "शिक्षण विचार"
पुणे : खानवीलकर प्रकाशन, महात्मा गांधी विद्यालय उरळी कांचन.
प्रथम आवृत्ती १९६३.

१५) गाजरे रा.वि. :- "उदयोन्मुख भारतीय समाज शिक्षण व शिकक्ष"
पुणे : नुतन प्रकाशन
प्रथम आवृत्ती १९९२.

१६) गोखले शरदचंद्र :- "बालविकास परिचय"
पुणे : साधना प्रकाशन.
प्रथम आवृत्ती - १९६५.

१७) जोशी ग.ब. :- "शैक्षणिक प्रशासन"
पुणे : ज्योती प्रकाशन
प्रथम आवृत्ती १९६१.

१८) ताम्हणकर एस.डी. :- "शैक्षणिक प्रशासन व नियोजन"
पुणे : नुतन प्रकाशन
प्रथम आवृत्ती १९७६.

१९) डॉ. पठाण नसीम महंमदखान :- "शैक्षणिक बाल मानसशास्त्र"
सोलापूर : ऋतुसत्य प्रकाशन.
प्रथम आवृत्ती १९८९.

२०) पारसनीस न.रा. :- "शिक्षणाची तात्विक व समाजशास्त्रीय भूमीका"
पुणे : नुतन प्रकाशन
प्रथम आवृत्ती १९८७.

२१) पाटील लीला :- "आजचे अध्यापन"
पुणे : श्री विद्या प्रकाशन
प्रथम आवृत्ती - १९७६.

२२) पाटील लीला / :- "आजचे शिक्षण : आजच्या समस्या"
कुलकर्णी विश्वंभर पुणे : श्री विद्या प्रकाशन .
प्रथम आवृत्ती : १९७१.

२३) ब्रम्हे शांता / :- "बालशिक्षण स्वरूप आणि पध्दती "
आठवले शांता पुणे : श्री.गोगटे प्रकाशन .
प्रथम आवृत्ती - १९७८.

२४) बापट भा. गो. :- "शैक्षणिक संघटना प्रशासन व प्रश्न "
पुणे : व्हीनस प्रकाशन.
दुसरी आवृत्ती- १९७३.

२५) डॉ. भिंताडे वि.रा. :- "शैक्षणिक संशोधन पध्दती "
पुणे : नुतन प्रकाशन.
प्रथम आवृत्ती - १९९८.

२६) मुळे रा. श./ :- "शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे."
उमाटे वि. तु. महाराष्ट्र विद्यापिठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर.
प्रथम आवृत्ती - १९७७.

२७) मोडक ताराबाई :- "बालकांचा हट्ट."
मुबंई : पूर्व प्राथमिक प्रकाशन, शीव.
प्रथम आवृत्ती -१९६२.

२८) मोडक ताराबाई :- "बालविकास व शिस्त."
कोसबाड : ग्राम बाल प्रकाशन, शिक्षा केंद्र.
प्रथम आवृत्ती :- १९६२.

२९) डॉ. बास्कर आनंद /:- "भारतीय शिक्षणाचे बहुजनीकरण."
डॉ. बास्कर पुष्पा पुणे : नुतन प्रकाशन.
प्रथम आवृत्ती :- १९८८.

३०) वाघ अनुताई :- "बालवाडी कशी चालवावी"
कोसवाड : ग्रामबाग प्रकाशन.
प्रथम आवृत्ती - १९६२

## शासकीय प्रकाशने

३१) "अध्यापन पदवीका शिक्षणक्रम"
पुणे : शिक्षणशास्त्र संस्था प्रकाशन,
महाराष्ट्र राज्य पुणे - ३०.

३२) "जीवन शिक्षण" (बालसाहित्य विशेषांक)
पुणे : शिक्षणशास्त्र संस्था प्रकाशन,
महाराष्ट्र राज्य पुणे - ३०.
आवृत्ती - मे / जून १९८२.

३३) "बालवाडी मार्गदर्शिका भाग - १."
संचालक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक प्रशिक्षण परिषद पुणे - ३०.
प्रथम आवृत्ती - मार्च १९८३ पुर्नमुद्रण जाने १९८८.

३४) "बालवाडी मार्गदर्शिका भाग - २."
संचालक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक प्रशिक्षण परिषद पुणे - ३०.
प्रथम आवृत्ती - १९८५.

३५) "बालवाडी मार्गदर्शिका भाग - ३."
संचालक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक प्रशिक्षण परिषद पुणे - ३०.
प्रथम आवृत्ती - १९८७.

३६) "बालवाडीसाठी गाणी, गोष्टी व खेळ"
संचालक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक प्रशिक्षण परिषद पुणे - ३०.
प्रथम आवृत्ती - १९४८ पुर्नमुद्रण १९८८.

३७) "मुक्तांगण"

संचालक सोलापूर जिल्हा परिषद, जिल्हा कक्ष

(आय.सी.डी.एस.) सोलापूर.

३८) "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - १९८६"

शैक्षणिक आव्हानाकडून कृतीकार्य क्रमाकडे प्रकाशन, संचालक महाराष्ट्र

शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे - ३०.

प्रथम आवृत्ती - १९८७.

## परिशिष्ट 'अ'

## प्रश्नावलीत प्राप्त झालेल्या शाळांची यादी

## दक्षिण सोलापूर तालुक्यातील शाळांची यादी

| अ. क्र. | शाळेचे नांव | गावाचे नांव |
|---|---|---|
| १) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | वंकलगी |
| २) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | वंकलगी |
| ३) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | आहेरवाडी |
| ४) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | आहेरवाडी |
| ५) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | होटगी |
| ६) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | होटगी |
| ७) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ३ | होटगी |
| ८) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ४ | होटगी |
| ९) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | बोरामणी |
| १०) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | बोरामणी |
| ११) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ३ | बोरामणी |
| १२) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ४ | बोरामणी |
| १३) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ५ | बोरामणी |
| १४) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ६ | बोरामणी |
| १५) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ७ | बोरामणी |
| १६) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | संगदरी |
| १७) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | मुळेगाव |
| १८) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | मुळेगाव |
| १९) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | मुळेगाव तांडा |
| २०) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | मुळेगाव तांडा |

| | | |
|---|---|---|
| २१) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | ब. हिप्परगे |
| २२) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | ब. हिप्परगे |
| २३) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | वडजी |
| २४) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | वडजी |
| २५) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | वरळेगाव |
| २६) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | कुंभारी |
| २७) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | कुंभारी |
| २८) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ३ | कुंभारी |
| २९) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ४ | कुंभारी |
| ३०) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ५ | कुंभारी |
| ३१) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ६ | कुंभारी |
| ३२) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ७ | कुंभारी |
| ३३) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ८ | कुंभारी |
| ३४) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ९ | कुंभारी |
| ३५) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | दर्गनहळ्ळी |
| ३६) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | दोड्डी |
| ३७) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | दोड्डी तांडा |
| ३८) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | तांदूळवाडी |
| ३९) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | तांदूळवाडी |
| ४०) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | |
| ४१) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | मुस्ती |
| ४२) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ३ | मुस्ती |
| ४३) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ४ | मुस्ती |

| | | |
|---|---|---|
| ४४) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ५ | मुस्ती |
| ४५) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ६ | मुस्ती |
| ४६) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | पिंजारवाडी |
| ४७) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | चापला तांडा |
| ४८) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | वळसंग |
| ४९) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | वळसंग |
| ५०) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ३ | वळसंग |
| ५१) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ४ | वळसंग |
| ५२) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ५ | वळसंग |
| ५३) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ६ | वळसंग |
| ५४) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ७ | वळसंग |
| ५५) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | आचेगांव |
| ५६) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | आचेगांव |
| ५७) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ३ | आचेगांव |
| ५८) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ४ | आचेगांव |
| ५९) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ५ | आचेगांव |
| ६०) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | चिंचोळी |
| ६१) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | चिंचोळी |
| ६२) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | रामपुर |
| ६३) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | रामपुर |
| ६४) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | वडगाव |
| ६५) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | दिंडूर |
| ६६) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | कर्देहळळी |

| | | |
|---|---|---|
| ६७) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | कर्देहळ्ळी |
| ६८) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | तोगराळ |
| ६९) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | गुर्देहळ्ळी |
| ७०) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | हणमगांव |
| ७१) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | शिंगडगांव |
| ७२) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | शिंगडगांव |
| ७३) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | धोत्री |
| ७४) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | धोत्री |
| ७५) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ३ | धोत्री |
| ७६) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | शिर्पनहळ्ळी |
| ७७) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | इंगळगी |
| ७८) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | बोरुळ |
| ७९) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | तिल्लेहाळ |
| ८०) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | कणंबस |
| ८१) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | कणंबस |
| ८२) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | शिरवळ |
| ८३) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | शिरवळ |
| ८४) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | आलेगाव |
| ८५) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | औज |
| ८६) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | यत्नाळ |
| ८७) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | वडापूर |
| ८८) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | वडापूर |
| ८९) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | अंत्रोळी |

| | | |
|---|---|---|
| ९०) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | अंत्रोळी |
| ९१) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | मनगोळी |
| ९२) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | गुंजेगाव |
| ९३) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | अकाले (म) |
| ९४) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | कंदलगाव |
| ९५) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | कंदलगाव |
| ९६) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ३ | कंदलगाव |
| ९७) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ४ | कंदलगाव |
| ९८) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | गावडेवाडी |
| ९९) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | मंद्रप |
| १००) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | मंद्रप |
| १०१) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ३ | मंद्रप |
| १०२ | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ४ | मंद्रप |
| १०३ | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ५ | मंद्रप |
| १०४ | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ६ | मंद्रप |
| १०५ | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ७ | मंद्रप |
| १०६ | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ८ | मंद्रप |
| १०७ | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ९ | मंद्रप |
| १०८ | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १० | मंद्रप |
| १०९) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | वसवनगर |
| ११०) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | येळेगाव |
| १११) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | माळकवठा |
| ११२) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | माळकवठा |

| | | |
|---|---|---|
| ११३) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | औज |
| ११४) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | औज |
| ११५) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | कारकल |
| ११६) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | लंवगी |
| ११७) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | लंवगी |
| ११८) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | सादेपूर |
| ११९) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | बाळगी |
| १२०) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | उळे |
| १२१) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | उळे |
| १२२) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ३ | उळे |
| १२३) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | उळेवाडी |
| १२४) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | कासेगांव |
| १२५) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | कासेगांव |
| १२६) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ३ | कासेगांव |
| १२७) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ४ | कासेगांव |
| १२८) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | गंगेवाडी |
| १२९) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | औराद |
| १३०) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | औराद |
| १३१) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ३ | औराद |
| १३२) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | राजूर |
| १३३) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | बिरनाळ |
| १३४) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | होनमुर्ग |
| १३५) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | होनमुर्ग |

| | | |
|---|---|---|
| १३६) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | बोळकवठा |
| १३७) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | बोळकवठा |
| १३८) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | संजवाड |
| १३९) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | वांगी |
| १४०) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | हत्तसंग |
| १४१) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | कुडल |
| १४२) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | टाकळी |
| १४३) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | टाकळी |
| १४४) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | सलगरवस्ती |
| १४५) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | बरुर |
| १४६) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | बरुर |
| १४७) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | चिंचपूर |
| १४८) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | कुरघोट |
| १४९) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | नांदणी |
| १५०) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | हत्तूर |
| १५१) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | हत्तूर |
| १५२) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ३ | हत्तूर |
| १५३) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ४ | हत्तूर |
| १५४) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ५ | हत्तूर |
| १५५) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ६ | हत्तूर |
| १५६) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | मद्रे |
| १५७) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | आनंदनगर |
| १५८) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | इ.ल.तांडा |

| | | |
|---|---|---|
| १५९) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | कु.तांडा |
| १६०) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | वडकबाळ |
| १६१) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | वांगी |
| १६२) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | वांगी |
| १६३) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | भंडारकवठे |
| १६४) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | भंडारकवठे |
| १६५) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ३ | भंडारकवठे |
| १६६) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ४ | भंडारकवठे |
| १६७) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ५ | भंडारकवठे |
| १६८) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ६ | भंडारकवठे |
| १६९) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | तेलवाव |
| १७०) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | खानापूर |
| १७१) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | कुसुर |
| १७२) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | कुसुर |
| १७३) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | विंचूर |
| १७४) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | विंचूर |
| १७५) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ३ | विंचूर |
| १७६) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | शंकरनगर |
| १७७) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | निंबर्गी |
| १७८) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - २ | निंबर्गी |
| १७९) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ३ | निंबर्गी |
| १८०) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - ४ | निंबर्गी |
| १८१) | अंगणवाडी मराठी शाळा क्रमांक - १ | फताटेवाडी |